• वर्ष : ०४ • अंक : ०१९ • पुणे • सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





# बदलाची सुरुवात घरापासून

संपादकीय — विचार आजचा... दिशा उद्याची...

**महिला सक्षमीकरण हा केवळ चर्चेचा किंवा घोषणांचा विषय राहू नये, तर तो समाजाच्या प्रत्यक्ष आचरणाचा भाग बनला पाहिजे. समाजाची खरी प्रगती मोजायची असेल, तर त्या समाजातील महिलांना किती समान संधी, स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि निर्णय घेण्याचा अधिकार मिळतो, हे पाहणे आवश्यक आहे. महिला सक्षम झाल्या तर केवळ एका व्यक्तीचे जीवन बदलत नाही, तर संपूर्ण कुटुंब आणि पुढची पिढी घडते.**



आजची महिला घराच्या चौकटीपुरती मर्यादित राहिलेली नाही. शिक्षण, उद्योग, प्रशासन, विज्ञान, क्रीडा, कला, शेती, संरक्षण, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे. अनेक महिला स्वतःचा व्यवसाय उभा करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत आहेत. अनेक जणी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कुटुंबाचा आधार बनत आहेत. मात्र, या यशस्वी चित्राच्या पाठीमागे अजूनही अनेक महिलांचे प्रश्न दुर्लक्षित आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणाची पहिली पायरी म्हणजे शिक्षण. मुलगा आणि मुलगी यांच्यात शिक्षणाच्या संधींमध्ये कोणताही भेदभाव असता कामा नये. मुलीला केवळ पदवी मिळवून देणे पुरेसे नाही; तिला स्वतःचे निर्णय घेता यावेत, आर्थिक व्यवहार समजावेत, कायद्याचे ज्ञान असावे आणि आपल्या अधिकारांसाठी आवाज उठवता यावा, यासाठीही शिक्षण आवश्यक आहे.

आर्थिक स्वावलंबन हा महिला सक्षमीकरणाचा आणखी एक महत्त्वाचा आधार आहे. स्वतःचे उत्पन्न असलेल्या महिलेला अनेक निर्णय आत्मविश्वासाने घेता येतात. त्यामुळे महिलांसाठी रोजगार, कौशल्यविकास, उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढवणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील महिलांना बचतगट, शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग आणि बाजारपेठेशी जोडण्याचे प्रयत्न अधिक प्रभावीपणे झाले पाहिजेत.

महिला सक्षमीकरणाची चर्चा करताना सुरक्षिततेचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. घर, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहतूक, रस्ते किंवा समाजमाध्यमे महिलांना प्रत्येक ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे आहेत; परंतु कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, तक्रारींचे तत्पर निराकरण आणि समाजाची संवेदनशील मानसिकता तितकीच महत्त्वाची आहे.

महिलांना समान अधिकार देताना त्यांच्या निर्णयक्षमतेचा सन्मान करणे आवश्यक आहे. घरातील आर्थिक निर्णय असोत, मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न असोत किंवा कुटुंबाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय महिलेचा आवाज समान महत्त्वाचा असला पाहिजे. "घरातील निर्णय पुरुषांनी घ्यायचे आणि महिला फक्त त्याची अंमलबजावणी करणार" ही मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे पुरुषांविरोधातील संघर्ष नव्हे. ते स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समाजनिर्मितीचे आंदोलन आहे. महिलांना पुढे आणण्यासाठी पुरुषांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वडिलांनी मुलीच्या स्वप्नांना प्रोत्साहन देणे, पतीने पत्नीच्या करिअरचा सन्मान करणे, भाऊ बहिणीच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवणे आणि समाजाने महिलांच्या कर्तृत्वाकडे पूर्वग्रह न ठेवता पाहणे हीच खरी सक्षमीकरणाची सुरुवात आहे.

आज महिला आरक्षण, शिक्षण, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. मात्र, केवळ धोरणे आणि योजना पुरेशा नाहीत. त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकातील महिलेपर्यंत पोहोचतो आहे का, याचा सातत्याने आढावा घेतला पाहिजे. शहरातील शिक्षित महिलेबरोबरच ग्रामीण, कष्टकरी, गरीब आणि वंचित महिलांच्या प्रश्नांकडेही गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

महिलेला संधी मिळाली की ती संधीचे सोने करू शकते, याची असंख्य उदाहरणे आपल्या आजूबाजूला आहेत. म्हणूनच महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ महिलांना दया किंवा सहानुभूती देणे नसून समान संधी, समान सन्मान आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे हा आहे. महिला सक्षम झाली तर घराची दिशा बदलते, मुलांचे भविष्य बदलते आणि समाजाची विचारसरणी बदलते. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी मोठ्या घोषणांपेक्षा छोट्या-छोट्या सकारात्मक बदलांची सुरुवात प्रत्येक घरातून झाली पाहिजे.

कारण सक्षम महिला ही केवळ एका कुटुंबाची ताकद नसते; ती सक्षम समाजाची आणि प्रगत राष्ट्राची पायाभरणी असते.

## सिंहगड पत्रकार संघ

# डिजिटल मीडियाची कार्यकारिणी जाहीर

### डिजिटल माध्यमांमध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना नवसंजिवनी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड पत्रकार संघाच्या नियंत्रणाखाली सिंहगड पत्रकार संघ डिजिटल मीडियाची नवीन कार्यकारिणी रविवारी (ता. २७) जाहीर करण्यात आली. डिजिटल पत्रकारितेला संघटित व्यासपीठ देण्यासह स्थानिक प्रश्न, नागरिकांच्या समस्या आणि सामाजिक विषयांना प्रभावीपणे वाचा फोडण्याचा उद्देश यावेळी व्यक्त करण्यात आला.

सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, उपाध्यक्ष जागृती कुलकर्णी, सचिव कल्याणराव आवताडे, खजिनदार निलेश चांदगुडे, सहसचिव जयंत जाधव, सदस्य शरणू जवळगी आणि तुकाराम वरक यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून स्थानिक प्रशासन, महापालिका, पोलिस, पीएमआरडीए तसेच अन्य शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून नागरिकांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच अपघात, आपत्ती, नागरी समस्या, सामाजिक उपक्रम आणि विकासकामांचे वस्तुनिष्ठ वृत्तांकन करून अचूक माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डिजिटल पत्रकारांसाठी पत्रकारिता, तथ्य पडताळणी, पत्रकारितेशी संबंधित कायदे, सोशल मीडिया वापर, व्हिडिओ पत्रकारिता आणि डिजिटल कंटेंट निर्मिती याबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शनपर उपक्रम घेण्यात येणार आहेत. बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी माहितीची पडताळणी करून अप्रमाणित माहिती आणि फेक न्यूजला आळा घालण्यावरही भर दिला जाणार आहे.

डिजिटल पत्रकारांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी संघटित प्रयत्न करण्याबरोबरच कार्यशाळा, चर्चासत्रे आणि मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन आहे. परिसरातील डिजिटल माध्यमांमध्ये कार्यरत पत्रकारांना एकत्रित करून सामाजिक बांधिलकी जपत जबाबदार आणि विश्वासार्ह डिजिटल पत्रकारितेचे व्यासपीठ उभारण्याचा संकल्प नवीन कार्यकारिणीने केला.

यावेळी सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, उपाध्यक्ष जागृती कुलकर्णी, सचिव कल्याणराव आवताडे, खजिनदार निलेश चांदगुडे, सहसचिव जयंत जाधव, सदस्य शरणू जवळगी, तुकाराम वरक आणि लक्ष्मण साबळे व नवीन कार्यकरणी उपस्थित होते.

**कार्यकारिणी**

- **अध्यक्ष :** प्रकाश यादव – व्हिजन महाराष्ट्र
- **उपाध्यक्ष :** विशाल भालेराव – पुणे क्राईम
- **उपाध्यक्ष :** कैलास गायकवाड – टॉप न्यूज
- **कार्याध्यक्ष :** ज्ञानेश्वर दळवी – नागरिक शस्त्र
- **सचिव :** गजानन मेनकुदळे – डिजिटल पुणे न्यूज
- **सहसचिव :** अमोल उदमले – सी २४ तास
- **खजिनदार :** ज्ञानेश्वर जाधव – महाराष्ट्र दर्पण
- **संपर्कप्रमुख :** अतुल मुळे – एमएच उपनगर
- **सदस्य :** सुरेखा मते – आरंभपर्व
- **सदस्य :** किरण बनसोडे – नागरिक शस्त्र
- **सदस्य :** विशाल वाघमारे – नागरिक शस्त्र
- **सदस्य :** अभिषेक मरगळे; आरंभपर्व

## थोडक्यात पण महत्वाचे



### हरवलेले सोन्याचे दागिने मनपा कर्मचाऱ्यांच्या तत्परतेने परत

धायरी (आरंभ पर्व) : अनंत चतुर्दशी, दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी वृषाली मिलिंद कदम व त्यांचे पती मिलिंद कदम गणेश विसर्जनासाठी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत हिंगणे खुर्द आरोग्य कोठीच्या विठ्ठलवाडी विसर्जन घाटावर आले होते. विसर्जनावेळी त्यांच्या गणपती बाप्पांच्या मूर्तीला सुमारे ५ तोळ्यांचा सोन्याचा नेकलेस व सोन्याची अंगठी घातलेली होती. नजरचुकीने हे दागिने मूर्तीसोबत दुपारी १२ वाजता विसर्जित झाले. रात्री सुमारे १० वाजता ही बाब त्यांच्या कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने विठ्ठलवाडी विसर्जन घाटावर येऊन आरोग्य निरीक्षक शिवाजीराव नलवडे, मोकादम प्रभाकर तुपेरे यांना माहिती दिली. यावेळी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या महापालिका सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांनी तत्काळ अधिकाऱ्यांना विसर्जन हौदात दागिन्यांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. महापालिका सहाय्यक आयुक्त पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ आरोग्य निरीक्षक मंगलदास माने, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक आशिष सुपणार, कनिष्ठ अभियंता प्रदीप नाणेकर, आरोग्य निरीक्षक शिवाजीराव नलवडे, मोकादम प्रभाकर तुपेरे तसेच मनपा सेवकांच्या पथकाने अथक प्रयत्न करून विसर्जित झालेले सोन्याचे दागिने शोधून काढले आणि ते कदम कुटुंबीयांकडे सुरक्षितपणे सुपूर्त केले. या तत्पर कार्यवाहीबद्दल कदम दाम्पत्याने महापालिका सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार अधिकारी आणि मनपा सेवक वर्गाचे मनःपूर्वक आभार मानले.




### संरक्षित शेतीच्या अनुदानासाठी शेतकरी आक्रमक

पुणे (आरंभ पर्व) : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या (एनएचबी) अंतर्गत संरक्षित शेतीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्क्यांवरून ३५ टक्के कपात करण्यात आल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. अनुदानातील कपात तसेच नव्या मार्गदर्शक तत्त्वांमधील जाचक अटी-शर्ती रद्द करून पूर्वीप्रमाणे ५० टक्के अनुदान सुरू करावे, या मागणीसाठी शेतकरी, फूल उत्पादक आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी पुणे येथील राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढला. दिल्ली येथे १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळाच्या कार्यालयासमोर आणि १६ सप्टेंबर रोजी कृषी भवनासमोर आंदोलन केल्यानंतर शेतकरी संघटना आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रात आंदोलनाची सुरुवात केली. पवना संस्कृती एफपीसी, इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (इग्मा), महाराष्ट्र फूल उत्पादक संघ आणि पुणे फूल उत्पादक कंपनीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी एनएचबीच्या उपसंचालकांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या आंदोलनात मावळ तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर, फूल उत्पादक संघाचे सुमारे ४०० शेतकरी, इग्माचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, राष्ट्रीय सहसचिव तथा महाराष्ट्र अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे, नितीन जगताप, रोशन पिंगळे, जयदीप ननवरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

# नवरात्रीच्या अनुषंगाने कर्तृत्ववान महिलांचा होणार सन्मान

### 'आरंभपर्व नवदुर्गा पुरस्कार २०२६'चे आयोजन; नामांकनासाठी आवाहन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्रीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यासाठी दैनिक आरंभपर्व पुणे यांच्या वतीने 'आरंभपर्व नवदुर्गा पुरस्कार २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. नारीशक्तीच्या विविध रूपांचा सन्मान करत समाजासाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांना या पुरस्काराच्या माध्यमातून गौरविण्यात येणार आहे.

शिक्षण, आरोग्य व वैद्यकीय सेवा, समाजसेवा, कला-संस्कृती व साहित्य, क्रीडा, उद्योग व उद्योजकता, शेती व ग्रामीण विकास, राजकारण व लोकसेवा, पर्यावरण संवर्धन, माध्यम व पत्रकारिता, तंत्रज्ञान, कायदा, महिला सक्षमीकरण तसेच विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांना या पुरस्कारासाठी नामांकन करता येणार आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवर मंडळी तसेच सेलिब्रिटी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असून पुरस्कारार्थींना आकर्षक ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. आपल्या कर्तृत्वाने यशाची नवी उंची गाठलेल्या आणि समाजासाठी प्रेरणास्थान ठरलेल्या महिलांच्या कार्याची दखल घेण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. पुरस्कार सोहळा १८ ऑक्टोबर २०२६, रविवार रोजी सायंकाळी ४ वाजता पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. इच्छुकांनी पुरस्कारासाठी आजच नामांकन करावे.

**• अधिक माहितीसाठी संपर्क •**

८६०५२८४२७२ (साबळे)

७२७६३६४१४२ (गंगणे)

# पुण्यातील स्टार्टअपचा कान्समध्ये गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वृद्धांच्या गरजा लक्षात घेऊन उत्पादने डिझाइन करणाऱ्या पुण्यातील 'हाऊस ऑफ टुमारो' या स्टार्टअपला 'इनलू' या उत्पादनाच्या डिझाइनसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आले आहे. 'इनलू' ही कोणत्याही व्यक्तीला आरामात वापरता येईल अशा प्रकारे तयार करण्यात आलेली टॉयलेट अटॅचमेंट आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना टॉयलेटमध्ये बसणे आणि उठणे सोपे होते तसेच त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींनाही मदत होते. वृद्धांच्या गरजेनुसार बाथरूममध्ये मोठे आणि खर्चिक बदल करण्याची गरजही 'इनलू'मुळे टाळता येते.



आर्किटेक्ट ऐश्वर्या एडाखे आणि प्रॉडक्ट डिझायनर शगुन मालवीय यांनी 'हाऊस ऑफ टुमारो'ची स्थापना केली आहे. चांगल्या प्रकारे वृद्धत्वाकडे जाणे हा केवळ वैद्यकीय विषय नसून डिझाइनशीही संबंधित विषय आहे, अशी 'हाऊस ऑफ टुमारो'ची भूमिका आहे. कंपनीचे प्रमुख उत्पादन 'इनलू' हे ज्येष्ठ नागरिकांना पुन्हा स्वावलंबी होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आले आहे. कमोडला जोडता येणारे सहाय्यक उपकरण किंवा बाथरूममध्ये वापरता येणारी पोर्टेबल टॉयलेट चेअर अशा दोन्ही प्रकारे त्याचा वापर करता येतो.

# तुळजाभवानीमातेच्या पलंगाचे जुन्नरहुन तुळजापूरकडे प्रस्थान



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

श्री तुळजा भवानीमातेच्या श्रमनिद्रेसाठी तुळजापूर येथे जाणाऱ्या मातेच्या पलंगाचे रविवारी (दि. २७) रोजी पारंपरिक वाद्यांच्या गजरात, भंडारा-खोबऱ्याची उधळण करत जुन्नरहून प्रस्थान झाले असल्याचे अध्यक्ष कैलास गरीबे यांनी सांगितले.

घोडेगाव (ता. आंबेगाव) येथून श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे शनिवारी (ता. १९ ऑगस्ट) जुन्नरला आगमन झाले. मातेचा पलंग आणि पालखीची शहरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. मातेच्या पासोड्याचे पूजन करण्यात आले. पलंगावर गादीची तसेच तुळजाभवानी मातेची विधिवत स्थापना करण्यात आली. जुन्नरला तिळवण तेली समाज कार्यालयात पलंगाचे आठ दिवस वास्तव्य होते. या काळात दररोज मोठ्या संख्येने भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत होती. जुन्नर शहर तिळवण तेली समाजाच्या वतीने पलंगोत्सवाच्या काळात विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. दररोज पहाटे श्री दुर्गा सप्तशती पाठ, सायंकाळी भजन, देवीची महाआरती आदी धार्मिक कार्यक्रम झाले. शनिवारी (दि.२६) होमहवन झाले. सायंकाळी भंडारा झाला. रविवारी सकाळी मातेच्या पलंगाची सकाळी शहरातून मिरवणूक काढली होती.

- **पारंपरिक वाद्यांचा गजर; भंडारा-खोबऱ्याची उधळण करीत पलंगाची मिरवणूक**

# पुण्यात 'सीएसएच इंडिया' व 'चैतन्य इंडस्ट्रीज'चा दणदणित शुभारंभ

### उद्योजकता आणि स्थानिकांसाठी रोजगाराची नवी दालने खुली!

- **सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे अल्कलाईन वॉटर**
- **आरोग्यदायी पाण्याचा पुरवठा सुलभ करण्यावर विशेष भर**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या औद्योगिक पटलावर आज एका नव्या आणि दणदणित पर्वाचा श्रीगणेशा झाला आहे! धायरी येथील परी कंपनी चौकाजवळ, अयोध्या हॉटेलसमोर असलेल्या सर्व्हिस नंबर २३/१२ येथे 'सीएसएच इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'चैतन्य इंडस्ट्रीज' या दोन अत्याधुनिक प्रकल्पांचा भव्य उद्घाटन सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला. तरुण आणि तडफदार उद्योजक तथा संस्थापक चैतन्य सोमनाथ होळकर यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले हे उद्योगविश्व आता पुण्याच्या भरभराटीमध्ये मानाचा तुरा रोवण्यासाठी सज्ज झाले आहेत." सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेत, 'चैतन्य इंडस्ट्रीज'च्या माध्यमातून पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरच्या क्षेत्रात एक क्रांतिकारी पाऊल उचलण्यात आले आहे. अल्कलाईन वॉटर, ब्लेंड वॉटर आणि मिनरल वॉटर या तिन्ही प्रीमियम सेगमेंटमध्ये उतरत असताना, एरवी सर्वसामान्यांच्या खिशाला परवडत नसलेले 'अल्कलाईन' पाणी आता अत्यंत कमी आणि लोकशाही मूल्यांच्या दरात उपलब्ध करून देण्याचा विडा या कंपनीने उचलला आहे. सुरुवातीला पुणे आणि त्यानंतर राज्यभरात आपल्या उत्पादनांचा विस्तार करत हॉटेल इंडस्ट्रीजच्या प्रत्येक गरजेला चोख उतरण्याचे त्यांचे टार्गेट आहे. दुसरीकडे, 'सीएसएच इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ने हेवी कन्स्ट्रक्शन आणि औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडवून दिली आहे. क्रशरसाठी लागणारे ३० मिमी होल पाडणारे अत्याधुनिक 'कॉलर्स ड्रिलर' (वॅगन ड्रिल) असो किंवा शासकीय रस्त्यांच्या कामात जमिनीची पोत व गुणवत्ता तपासणारे 'टायटन पीएक्स-३५' सारख्या अत्याधुनिक उपकरणांची पहिली यशस्वी सिरीज असो, ही सर्व उत्पादने आज मेक इन इंडियाच्या जोरावर संपूर्ण देशात आपली दखल घ्यायला लावत आहेत. या प्रकल्पामुळे केवळ औद्योगिक क्रांतीच होत नाहीये, तर स्थानिक तरुण आणि होतकरू कामगारांसाठी रोजगाराची नवीन दालने खुली झाली असून, स्थानिकांना हक्काचा रोजगार मिळवून देण्याचे मोठे सामाजिक शिवधनुष्य या कंपनीने पेलले आहे." एकाच छताखाली दोन मोठ्या उद्योगांचा हा श्रीगणेशा पुणेकरांसाठी अभिमानास्पद ठरत असून, या यशस्वी उद्योजकाचे, सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### Mivi One 5G सह Miviची स्मार्टफोन बाजारपेठेत एंट्री

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील स्वदेशी ग्राहक तंत्रज्ञान ब्रँड Mivi ने 'Mivi One 5G' या स्मार्टफोनच्या माध्यमातून भारतीय स्मार्टफोन बाजारपेठेत प्रवेश केला आहे. दैनंदिन वापरासाठी दमदार कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि स्वच्छ अँड्रॉइड अनुभव देण्यावर या स्मार्टफोनमध्ये भर देण्यात आला आहे. ४ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित स्नॅपड्रॅगन ४ जेन २ मोबाइल प्लॅटफॉर्म असलेल्या Mivi One 5G मध्ये ६,००० एमएएच क्षमतेची बॅटरी आणि ५० मेगापिक्सेलचा ड्युअल कॅमेरा देण्यात आला आहे. याशिवाय 'प्युअर अँड्रॉइड १६' अनुभव आणि 'Mivi Super Call' यांसारखी वैशिष्ट्येही देण्यात आली आहेत. 'Pretty Powerful' या संकल्पनेसह सादर करण्यात आलेला हा स्मार्टफोन स्ट्रीमिंग, छायाचित्रण, समाजमाध्यमांचा वापर, खेळ, एकाच वेळी अनेक कामे आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. तरुण ग्राहकांना लक्षात घेऊन आकर्षक रचना आणि कार्यक्षम तंत्रज्ञानाचा मेळ साधण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे.



### मावळा जवान संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव

खानापूर (आरंभ पर्व) : खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात मावळा जवान संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा गुणगौरव तसेच होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. मावळा जवान संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवभक्त लक्ष्मण हरिभाऊ दारवटकर यांनी संस्थापक अध्यक्ष शिवश्री दत्ताजी नलावडे (ज्येष्ठ इतिहास संशोधक व पत्रकार) यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याबरोबरच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा संघटनेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक व पत्रकार दत्ताजी नलावडे, पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका अनिता इंगळे, पंचायत समिती हवेलीचे सदस्य युवराज वांजळे, वनपरिमंडळ अधिकारी वैशाली हडवळे, माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, बाजीराव पारगे, सत्यवान नवघणे, शशिकांत जाधव (वृत्तपत्र लेखक), संपत जावळकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच होतकरू, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत लक्ष्मण हरिभाऊ दारवटकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मावळा जवान संघटनेचे दीपक बद्रिगे, आप्पा जावळकर व शांताराम लांधे यांनी मोलाचे सहकार्य केले.

### गुणवंत कामगार कल्याण मंडळाचा पर्यावरणपूरक उपक्रम



पुणे (आरंभ पर्व) : गणपती विसर्जन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संवर्धन आणि पुणे शहर स्वच्छ ठेवण्याचा संदेश देत गुणवंत कामगार कल्याण मंडळ, पुणे शहर यांच्या वतीने कर्वेनगर गणपती विसर्जन घाटावर निर्माल्य संकलन व जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. पुणे महानगरपालिका, स्वच्छ संस्था व जनवाणी संस्था यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात सुमारे दीड टन निर्माल्याचे संकलन करण्यात आले. निर्माल्य नदीपात्रात न टाकता त्याचे योग्य व्यवस्थापन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. पर्यावरण प्रदूषण कमी करण्यासोबतच शहर स्वच्छ ठेवण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमाचे नागरिकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. अनेक नागरिकांनी निर्माल्य संकलनासाठी सहकार्य करत पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाला प्रोत्साहन दिले. उपक्रमासाठी गुणवंत कामगार कल्याण मंडळ पुणे शहराचे अध्यक्ष संपत खैरे, उपाध्यक्ष नामदेवराव भूरूक, सचिव संजय गोळे, ज्येष्ठ गुणवंत कामगार भाई ताम्हणे, कामगार भूषण राजेंद्र वाघ, गुणवंत कामगार दिगंबर पोकळे, रवींद्र रायकर, महादेव पाटील, मुकुंद खटावकर, सदाशिव एकसंबे, नामदेव उईके, राकेश सावंत, सय्यद मॅडम व रमेश डुंबरे यांनी परिश्रम घेतले.

## श्री काळभैरवनाथ पतसंस्थेची २४वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खानापूर येथील श्री काळभैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादितची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ गेणबा यादव यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

ही पतसंस्था आता २५ व्या वर्षात पदार्पण करीत असल्याचा अभिमान असल्याचे अध्यक्ष रघुनाथ यादव यांनी यावेळी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत सर्वांगीण विकासाचे ध्येय व धोरण निश्चित करून, सर्व संचालकांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचा कारभार सुरू असल्याचे यादव यांनी नमूद केले.

सभेत पतसंस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अहवाल वर्षात संस्थेला १३.७४ टक्के निव्वळ नफा झाला असून, सभासदांच्या ठेवींमध्ये गतवर्षीच्या तुलनेत १९.८० टक्के वाढ झाली आहे. या आर्थिक प्रगतीबद्दल संचालक मंडळ व सभासदांनी समाधान व्यक्त केले.

वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्रीरंग चव्हाण व सदाशिव दांगट उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जावळकर, सचिव अमोल जावळकर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब शिंदे, संचालक सागर जावळकर, संचालिका शारदा जावळकर, संचालिका साधना यादव, तज्ज्ञ संचालक विश्वनाथ साळेकर, कार्यलक्षी संचालक नागेश धुमाळ यांच्यासह पतसंस्थेचे सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपाध्यक्ष नंदकुमार जावळकर यांनी सर्व सभासदांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. सभेचे सूत्रसंचालनही त्यांनी केले. ज्येष्ठ संचालक बाबासाहेब शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डिजिटल फसवणुकीच्या घटनांमध्ये तीव्र वाढ

- एअरटेलने ९८.४ अब्ज स्पॅम कॉल्सची नोंद केली
- एआय-आधारित सेफ नेटवर्क सोल्युशन्सने ४.४ अब्ज स्पॅम मेसेजेस शोधले आणि १६.२ लाखांहून अधिक मालिशस लिंक्स ब्लॉक केल्या




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताची डिजिटल इकॉनॉमी वेगाने विस्तारत आहे; मात्र त्यासोबतच सायबर फसवणुकीचे प्रमाण आणि त्यातील क्लिष्टताही वाढत आहे. पूर्वी प्रामुख्याने स्पॅम कॉल्स आणि फिशिंग मेसेजेसपुरती मर्यादित असलेली समस्या आता फसवणुकीच्या अधिक व्यापक इकोसिस्टममध्ये विकसित झाली आहे. यामध्ये इम्पर्सोनेशन स्कॅम्स, बनावट बँकिंग रिक्वेस्ट्स, मालिशस लिंक्स, इन्व्हेस्टमेंट फ्रॉड आणि ओटीपीशी संबंधित आर्थिक फसवणुकींचा समावेश आहे. सरकार आणि इंडस्ट्रीच्या डेटावरून ही समस्या आता मोठ्या प्रमाणावर पसरलेली असून अधिक संघटित स्वरूप धारण करत असल्याचे दिसून येते. इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर (आय४सी)च्या माहितीनुसार, गेल्या सहा वर्षांत भारतीयांनी सायबर फसवणुकीमुळे ₹५२,९७६ कोटींहून अधिक रक्कम गमावली आहे. एनसीआरबीच्या डेटामधूनही सायबर क्राइमच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते, तर देशभरातील एकूण गुन्ह्यांचे प्रमाण घटले आहे.

## विसावा सोशल फाउंडेशन वृद्धाश्रमात गणरायाला भावपूर्ण निरोप





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने विसावा सोशल फाउंडेशन संचलित वृद्धाश्रमात गणरायाला भक्तिभावाने भावपूर्ण निरोप देण्यात आला. नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या सौ. सुनीता ताई राजाराम डांगे यांच्या शुभहस्ते गणरायाची आरती संपन्न झाली.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी आश्रमातील आजी-आजोबांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. तसेच उपस्थित ज्येष्ठांना खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर गणपती बाप्पाच्या मूर्तीची पारंपरिक पद्धतीने भक्तिमय वातावरणात विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.

यावेळी संस्थेचे श्री. मल्लिकार्जुन मुंडेवाडी, सौ. सुजाताताई म्हस्के, माननीय सागर पाटील, श्री. चेतन मराठे, श्री. बलभीम कुरुंद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्वाती ताई तरडे यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, सेवाभावी कार्यकर्ते तसेच उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. "सेवा, स्नेह आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडवून आणत ज्येष्ठांच्या सहवासात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला."

## एक हेक्टर ऊस आगीत भस्मसात

- शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कष्टांवर पाणी
- रुईतील नागनाथ भोसले यांना मोठा आर्थिक फटका
- ऊसासोबत ठिबक संचही जळाला



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

डोळ्यांसमोर हिरवेगार उभे असलेले पीक क्षणात आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि वर्षभर घेतलेले कष्ट अक्षरशः राख झाले. रुई (ता. बार्शी) येथील शेतकरी नागनाथ वसंत भोसले यांच्या शेतातील सुमारे एक हेक्टर ऊस पिकाला गुरुवारी (दि. २४) सायंकाळी पाचच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत संपूर्ण ऊस पिकासह ठिबक सिंचन यंत्रणाही जळून खाक झाली. या घटनेत भोसले यांचे अंदाजे चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

भोसले यांची रुई येथील गट क्रमांक १८५/१ मध्ये एक हेक्टर ४२ आर शेती आहे. त्यापैकी एक हेक्टर क्षेत्रात त्यांनी ऊस लागवड केली होती. पीक चांगले आले असल्याने त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाची आशा त्यांनी बाळगली होती. मात्र, अचानक आलेल्या आगीने त्यांच्या या आशेवरच पाणी फेरले.

भोसले हे वैराग येथील घरी असताना नेताजी पाटील यांचा फोन आला. 'शेतातील उसाला आग लागली आहे,' ही बातमी ऐकताच त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी तातडीने शेताकडे धाव घेतली.

मात्र, तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. डोळ्यांसमोर कष्टाने उभे केलेले ऊसाचे पीक आणि शेतीसाठी उभारलेली ठिबक सिंचन यंत्रणा जळताना पाहण्याची वेळ त्यांच्यावर आली.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, नेताजी पाटील, चौरंगनाथ पाटील व अभिजित केडे यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यासाठी मदत केली.

"ऊस आणि ठिबक सिंचन यंत्रणा मिळून माझे सुमारे चार लाख रुपयांचे नुकसान झाले. वर्षभर कष्ट करून उभे केलेले पीक डोळ्यांसमोर जळून खाक झाले," अशी व्यथा शेतकरी नागनाथ भोसले यांनी व्यक्त केली.

# टिश्यू पेपरच्या अति वापरामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम व उपाययोजना

**(दै. आरंभ पर्व)**



**लेखिका : सौ. श्रद्धा नाडकर्णी**

**आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत टिश्यू पेपर हा दैनंदिन वापरातील एक सहज उपलब्ध आणि सोयीचा घटक बनला आहे. हॉटेल, कार्यालये, रुग्णालये, मॉल, शाळा तसेच घरांमध्ये हात पुसण्यासाठी, चेहरा स्वच्छ करण्यासाठी आणि विविध स्वच्छताविषयक कारणांसाठी टिश्यूचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. मात्र, एकदाच वापरून फेकून दिला जाणारा हा कागदी पदार्थ पर्यावरणाच्या दृष्टीने गंभीर समस्या निर्माण करू शकतो. सोयीसाठी वाढत चाललेला टिश्यूचा अतिरेकी वापर जंगलतोड, पाण्याचा मोठ्या प्रमाणातील वापर, ऊर्जा खर्च, कचऱ्याचे वाढते प्रमाण आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन अशा अनेक पर्यावरणीय समस्यांशी संबंधित आहे.**

टिश्यू पेपर प्रामुख्याने लाकडापासून मिळणाऱ्या लगद्यापासून तयार केला जातो. निलगिरी, बाभूळ, पॉपलर, सुबाभूळ, कॅसुआरिना यांसारख्या झाडांपासून मिळणाऱ्या लाकडाचा लगदा त्यासाठी वापरला जातो. काही टिश्यू पुनर्वापरित कागदापासूनही तयार केले जातात; मात्र बाजारातील अनेक उत्पादनांसाठी आजही नव्या लाकडापासून मिळणाऱ्या लगद्याचा वापर केला जातो. त्यामुळे टिश्यूच्या वाढत्या मागणीचा परिणाम नैसर्गिक संसाधनांवर होतो.

टिश्यूसाठी थेट एका टिश्यूमागे एक झाड तोडले जाते, असे नाही. एका प्रौढ झाडापासून मोठ्या प्रमाणात कागदी उत्पादने तयार होऊ शकतात. मात्र, जगभरात टॉयलेट टिश्यू आणि इतर कागदी स्वच्छता उत्पादनांची मागणी मोठी असल्याने त्यासाठी मोठ्या प्रमाणात लाकूड आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा वापर केला जातो. भारतातही गेल्या काही वर्षांत टिश्यू पेपरचा वापर झपाट्याने वाढत आहे. शहरांमध्ये बदलती जीवनशैली, वाढते शहरीकरण, हॉटेल आणि सेवा क्षेत्राचा विस्तार तसेच स्वच्छतेविषयी वाढलेली जागरूकता यामुळे टिश्यूचा वापर वाढताना दिसतो.

टिश्यू पेपरच्या अति वापराचा सर्वात मोठा परिणाम जंगलांवर होतो. कागदासाठी आवश्यक असलेल्या लाकडाची मागणी वाढल्यास वृक्षतोडीवर दबाव वाढतो. जंगलांचे क्षेत्र कमी झाल्यास पक्षी, प्राणी, कीटक आणि इतर जीवांचे नैसर्गिक अधिवास धोक्यात येतात. जंगल हे कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्याचे महत्त्वाचे माध्यम असल्याने जंगलांचे नुकसान झाल्यास हवामान बदलाच्या समस्येलाही हातभार लागू शकतो. त्यामुळे टिश्यूचा प्रत्येक अनावश्यक वापर हा केवळ कागदाचा अपव्यय नसून नैसर्गिक संसाधनांच्या वापराशी संबंधित प्रश्न आहे.

टिश्यू पेपरच्या निर्मितीमध्ये पाण्याचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो. लाकडापासून लगदा तयार करणे, त्याची प्रक्रिया करणे, धुणे, कागद तयार करणे आणि अंतिम उत्पादन तयार करणे या विविध टप्प्यांमध्ये पाणी लागते. उत्पादन प्रक्रियेत वापरली जाणारी काही रसायने योग्य पद्धतीने हाताळली नाहीत तर जलप्रदूषणाची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे टिश्यूच्या वापरामागे केवळ झाडांचा नव्हे, तर पाण्यासारख्या मौल्यवान नैसर्गिक संसाधनाचाही प्रश्न जोडलेला आहे.

> टिश्यू पेपर हा आधुनिक जीवनातील सोयीचा भाग असला तरी त्याचा अतिरेकी वापर टाळणे ही काळाची गरज आहे. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यांच्यात संतुलन साधणे आवश्यक आहे. गरज नसताना टिश्यू वापरण्याऐवजी पर्यायी आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला, पुनर्वापरित कागदापासून तयार केलेल्या उत्पादनांना प्राधान्य दिले आणि अनावश्यक वापराला आळा घातला, तर पर्यावरणावरील ताण निश्चितच कमी करता येईल. आजची छोटी बचत उद्याच्या पिढीसाठी मोठे पर्यावरणीय संरक्षण ठरू शकते. म्हणूनच "गरज असेल तेव्हाच टिश्यू वापरा; पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी जपा" हा संदेश प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे.

टिश्यू पेपरच्या उत्पादनापासून ते ग्राहकापर्यंत पोहोचेपर्यंत अनेक टप्प्यांवर ऊर्जा खर्च होते. झाडांची तोड, लाकडाची वाहतूक, लगदा तयार करणे, कागदाचे उत्पादन, त्याचे पॅकिंग आणि बाजारपेठेत वाहतूक या सर्व प्रक्रियांमधून हरितगृह वायूंचे उत्सर्जन होऊ शकते. त्यामुळे टिश्यूचा अनावश्यक वापर कमी करणे हे संसाधनांची बचत करण्याबरोबरच पर्यावरणीय परिणाम कमी करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

टिश्यूचा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे त्यापासून निर्माण होणारा कचरा. बहुतांश टिश्यू एकदाच वापरले जातात आणि त्यानंतर ते कचऱ्यात जातात. वापरलेला टिश्यू पुन्हा त्याच स्वरूपात वापरणे शक्य नसते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात टिश्यू वापरल्यास कचऱ्याचे प्रमाणही वाढते. त्याची योग्य विल्हेवाट न लावल्यास परिसर अस्वच्छ होण्याबरोबरच कचरा व्यवस्थापन यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. टिश्यूच्या वाढत्या वापरामागे अनेक कारणे आहेत. सहज उपलब्धता, स्वच्छतेची भावना, एकदाच वापरून फेकून देण्याची सवय, बदलती जीवनशैली आणि हॉटेल, कॅफे, कार्यालये यांसारख्या ठिकाणी त्याचा सहज वापर ही त्यातील प्रमुख कारणे आहेत. स्वच्छता राखणे निश्चितच महत्त्वाचे आहे; मात्र स्वच्छतेच्या नावाखाली गरजेपेक्षा अधिक टिश्यू वापरणे टाळणेही तितकेच आवश्यक आहे.

पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी टिश्यूचा वापर पूर्णपणे बंद करणे प्रत्येक ठिकाणी शक्य किंवा आवश्यक असेलच असे नाही. मात्र त्याचा विवेकपूर्ण आणि गरजेपुरता वापर निश्चितच करता येतो. घरांमध्ये शक्य असेल तेथे कापडी रुमाल, धुण्यायोग्य नॅपकिन आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवता येतो. हॉटेल, कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणीही "गरज असेल तेव्हाच टिश्यू वापरा" अशी जनजागृती करता येते. पुनर्वापरित कागदापासून तयार केलेल्या टिश्यूला प्राधान्य देणे हाही एक पर्याय ठरू शकतो.

**यासोबतच मुलांमध्ये लहानपणापासूनच नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व आणि कचरा कमी करण्याची सवय रुजवणे आवश्यक आहे. "कमी वापरा, पुन्हा वापरा आणि पुनर्वापर करा" या तत्त्वांचा दैनंदिन जीवनात अवलंब केल्यास पर्यावरण संवर्धनाला मोठी मदत होऊ शकते. शाळा, महाविद्यालये, कार्यालये, हॉटेल आणि विविध संस्थांनीही टिश्यूच्या विवेकपूर्ण वापराबाबत जनजागृती उपक्रम राबवायला हवेत. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची किंवा पर्यावरण संस्थांची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकाच्या छोट्या सवयींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. एका व्यक्तीने दररोज काही टिश्यू कमी वापरले तरी वर्षभरात मोठ्या प्रमाणात कागदाची बचत होऊ शकते. अशा छोट्या बदलांमुळे झाडे, पाणी आणि ऊर्जा यांची बचत करण्यास हातभार लागतो.**

## थोडक्यात पण महत्वाचे




### क्रॉम्प्टनची 'गॅलेक्सी फेस्टिव्ह लाईट्स'ची नवीन श्रेणी

मुंबई (आरंभ पर्व) : सणासुदीच्या काळातील रोषणाई हा उत्सव आणि घराच्या सजावटीचा अविभाज्य भाग बनला आहे. रंगीबेरंगी आणि आकर्षक प्रकाशयोजनेमुळे घराच्या सजावटीला वेगळे सौंदर्य प्राप्त होते. ग्राहकांच्या सणासुदीच्या आनंदात अधिक भर घालण्यासाठी क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने 'गॅलेक्सी फेस्टिव्ह लाईट्स' या नवीन श्रेणीचे सादरीकरण केले आहे. आजच्या काळात ग्राहक सणासुदीच्या रोषणाईकडे केवळ प्रकाशाचा स्रोत म्हणून पाहत नाहीत, तर ती घराच्या सजावटीचा महत्त्वाचा भाग मानतात. त्यामुळे आकर्षक दिसणारी, ऊर्जा कार्यक्षम, सहज बसवता येणारी आणि घरातील सणासुदीचे वातावरण अधिक खुलवणारी रोषणाई निवडण्याकडे ग्राहकांचा कल वाढत आहे. ही बदलती गरज लक्षात घेऊन क्रॉम्प्टनने 'गॅलेक्सी फेस्टिव्ह लाईट्स'ची नवीन श्रेणी विकसित केली आहे. या श्रेणीमध्ये आकर्षक आणि आधुनिक डिझाईन, चैतन्यमय प्रकाश, वापरण्यास सुलभ रचना तसेच विविध सजावटीच्या गरजांनुसार पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### पुण्यात 'व्हिला लिव्हिंग'चे पुनरागमन



पुणे (आरंभ पर्व) : गेल्या काही वर्षांत पुण्याचे निवासी क्षेत्र मोठ्या प्रमाणात बदलले आहे. शहर जसजसे आर्थिक आणि रोजगाराचे मोठे केंद्र बनत गेले, तसतसे येथे उंच इमारतींचे आणि मोठ्या गृहसंकुलांचे प्रमाण वाढत गेले. मात्र, भरपूर जागा, खासगीपणा आणि आपल्या आवडीनुसार सजवता येईल असे स्वतःचे स्वतंत्र घर असावे, ही इच्छा आजही अनेकांच्या मनात आहे. हीच गरज ओळखून पेनिन्सुला लँड लिमिटेड या अशोक पिरामल ग्रुपमधील कंपनीने पुण्यातील गहुंजे येथे 'अशोकव्हिलाज' हा प्रकल्प आणला आहे. यात केवळ १९ प्रीमियम फर्निश्ड व्हिला आहेत. दर्जेदार निवासी प्रकल्प उभारण्याची पेनिन्सुला लँडची परंपरा आहे. 'अशोकव्हिलाज' हा प्रकल्प याच परंपरेच्या वाटचालीतील पुढचे पाऊल आहे. आजच्या घर खरेदीदारासाठी स्वतंत्र घराची संकल्पना कशी बदलत आहे, हेही या प्रकल्पातून दिसून येते. 'अशोकव्हिलाज'मध्ये खरेदीदाराला स्वतंत्र घर आणि गृहसंकुलातील सोयीसुविधा यांपैकी एकाची निवड करावी लागत नाही. इथे व्हिलासारखा खासगीपणा आणि मोकळेपणा मिळतो, तसेच सुव्यवस्थित गृहसंकुलातील सुविधाही मिळतात.

### विक्रमी गर्दीतही वीजपुरवठा अखंडित; महावितरणच्या 'टीमवर्क'ला सलाम!



पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील लक्ष्मी रोड येथील ऐतिहासिक गणपती विसर्जन मिरवणुकीसह खडकी, शिवाजीनगर, गावठाण, वडारवाडी, रामोशीवाडी, गोखलेनगर, सुस रोड तसेच इतर परिसरात यंदा मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी झाली. मात्र, या विक्रमी गर्दीतही महावितरणने अत्यंत सतर्कतेने काम करत अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा राखण्यात यश मिळविले. विसर्जन मिरवणुकीपूर्वीच महावितरणकडून पूर्वनियोजन, प्रतिबंधात्मक देखभाल, तांत्रिक तपासणी आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. मिरवणूक सुरू झाल्यानंतरही अधिकारी आणि लाईन स्टाफने प्रत्यक्ष ठिकाणी सतर्क राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. त्यामुळे कोणताही मोठा वीजविषयक अडथळा निर्माण न होता गणेशभक्तांना सुरक्षित वातावरणात मिरवणुकीचा आनंद घेता आला. या संपूर्ण नियोजनासाठी मुख्य अभियंता श्री. पडळकर साहेब, अधीक्षक अभियंता श्री. गायकवाड साहेब आणि कार्यकारी अभियंता श्री. थिटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारी पार पाडली.

### Ai+ Smartphone ने सणासुदीत आणले फ्लॅगशिप दर्जाचे तंत्रज्ञान




पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीपूर्वीच्या सणासुदीच्या खरेदीचा उत्साह लक्षात घेत Ai+ Smartphone ने स्मार्टफोन, टॅबलेट आणि उत्पादकता-केंद्रित उपकरणांच्या श्रेणीत तीन नवीन उत्पादने सादर केली आहेत. कंपनीने Pulse 2 FE, NovaTab आणि Nova LapTab ही तीन उपकरणे बाजारात आणत आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि दैनंदिन कामकाजाच्या विविध गरजा लक्षात घेऊन ही उपकरणे विकसित करण्यात आली आहेत. देशभरातील ग्राहक सणासुदीच्या काळात नवीन तंत्रज्ञानाची खरेदी, उपकरणांचे अद्ययावतीकरण आणि भेटवस्तूंची खरेदी करण्यासाठी सज्ज होत असताना Ai+ Smartphone ने ही नवीन उत्पादने सादर केली आहेत. पहिल्यांदा स्मार्टफोन घेणारे ग्राहक, कनेक्टेड शिक्षणासाठी उपकरण शोधणारे विद्यार्थी तसेच मोठ्या पडद्यावर मनोरंजन आणि कामकाजाचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी या नव्या श्रेणीत विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रत्येक उपकरणाची रचना विशिष्ट गरजा लक्षात घेऊन करण्यात आली आहे. 'First Step to a Smarter World' या संकल्पनेअंतर्गत सादर करण्यात आलेला Pulse 2 FE हा पहिल्यांदा स्मार्टफोन घेणाऱ्या किंवा नवीन उपकरणावर अद्ययावत होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. तर NovaTab आणि Nova LapTab यांच्या माध्यमातून कंपनीने ५जी टॅबलेटच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. मोठी स्क्रीन, ५जी जोडणी आणि शिक्षणावर विशेष भर देणारा NovaTab विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरण्याचा कंपनीचा दावा आहे. Nova LapTab मध्ये १३.२ इंचांचा मोठा पडदा, लेखणीचा आधार आणि जोडता येणारा की-बोर्ड देण्यात आला असून त्यातून संगणकासारखा कामाचा अनुभव मिळतो.

# प्राण्यांच्या संगोपनासाठी झिगली पेट केअरची वार्षिक आरोग्य पॅकेजेस




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पाळीव प्राण्यांच्या आरोग्याची नियमित देखभाल, लसीकरण, तपासण्या, ग्रूमिंग आणि पशुवैद्यकीय सल्ला या सर्व गोष्टींचे नियोजन करणे अनेकदा पाळीव प्राण्यांच्या पालकांसाठी आव्हानात्मक ठरते. हीच गरज लक्षात घेऊन झिगली पेट केअरने पुण्यात वार्षिक आरोग्य पॅकेजेस सादर केली आहेत. या पॅकेजमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, ग्रूमिंग आणि पशुवैद्यकीय सेवांचा एकाच वार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आहे. झिगली पेट केअरसाठी युनोमरने केलेल्या संशोधनानुसार, पाळीव प्राण्यांच्या पालकांना दैनंदिन देखभालीमध्ये सोय, खर्चातील बचत आणि विश्वासार्ह तज्ज्ञ मार्गदर्शन यांना महत्त्व असल्याचे दिसून आले. पुण्यासह देशातील १७ ठिकाणांतील पाळीव प्राण्यांच्या पालकांचा या अभ्यासात समावेश करण्यात आला होता. सर्वेक्षणातील जवळपास दहापैकी नऊ पालकांनी सर्वसमावेशक पेट-केअर सेवांमध्ये मध्यम स्वरूपाचे स्वारस्य व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर झिगली पेट केअरने पिल्लू, प्रौढ आणि ज्येष्ठ अशा तीन जीवन टप्प्यांनुसार वार्षिक आरोग्य पॅकेजेस उपलब्ध केली आहेत. या योजनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वर्षभर उपलब्ध असलेला पशुवैद्यकीय सल्ला. पपी केअर पॅकेजची किंमत ₹१९,६७९ असून, त्यात ₹२६,८९५ किमतीचे लाभ मिळतात. यामध्ये लसीकरण, जंतनाशक उपचार, प्राथमिक रक्त तपासणी, आहार व पोषणविषयक सल्ला, ग्रूमिंग आणि पशुवैद्यांचा उपलब्ध सल्ला यांचा समावेश आहे. अडल्ट केअर पॅकेजची किंमत ₹२३,२३२ असून, त्यामध्ये ₹४३,३८७ किमतीचे लाभ दिले जातात. वार्षिक लसीकरण, जंतनाशक उपचार, रक्त व लघवी तपासणी, छातीचा एक्स-रे, दातांची तपासणी, ग्रूमिंग, पाच रात्रींसाठी बोर्डिंग/आयपीडी सुविधा आणि अमर्यादित पशुवैद्यकीय सल्ला या सुविधांचा यात समावेश आहे. सीनियर केअर पॅकेजची किंमत ₹३४,७६४ असून, त्यात ₹५४,०८३ किमतीचे लाभ मिळतात. वर्षातून दोनदा रक्त व लघवी तपासणी, ईसीजी, रक्तदाब तपासणी, सांधे व हाडांची तपासणी, सात रात्रींसाठी बोर्डिंग/आयपीडी सुविधा, घरून नमुना संकलन आणि अमर्यादित पशुवैद्यकीय सल्ला या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.

> या वार्षिक योजनांसाठी दरमहा ₹१,६४० पासून सुरू होणारा १२ महिन्यांचा हप्त्याचा पर्याय उपलब्ध आहे. तसेच तीन आणि सहा महिन्यांच्या कालावधीसाठी शून्य व्याजाचे हप्ते भरण्याचे पर्यायही देण्यात आले आहेत. त्यामुळे पाळीव प्राण्यांच्या वर्षभराच्या आरोग्य व देखभालीच्या खर्चाचे नियोजन करणे पालकांसाठी अधिक सोयीचे होणार आहे.

याबाबत झिगली पेट केअरचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ जैन म्हणाले, "पाळीव प्राण्यांचे पालक त्यांच्या आरोग्याबाबत अधिक जागरूक होत आहेत. मात्र वर्षभरातील लसीकरण, आरोग्य तपासण्या, जंतनाशक उपचार आणि इतर नियमित गरजांचे व्यवस्थापन करणे कधीकधी आव्हानात्मक ठरते. आमच्या वार्षिक आरोग्य पॅकेजेसच्या माध्यमातून या महत्त्वाच्या सेवा एका योजनेत उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आवश्यकतेनुसार पशुवैद्यकीय मार्गदर्शन सहज उपलब्ध करून देणे आणि नियमित प्रतिबंधात्मक काळजी घेणे अधिक सोपे करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे."

पाळीव प्राण्यांच्या वर्तनात, आहारात, हालचालींमध्ये किंवा एकूण आरोग्यात बदल जाणवल्यास पशुवैद्यकीय सल्ला घ्यावा की नाही, याबाबत अनेकदा मालक संभ्रमात असतात. अशा वेळी वर्षभर पशुवैद्यकीय मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या पॅकेजचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

## वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्सचे चौथे पर्व

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

स्मार्टफोन ब्रँड वीवोने नॅशनल जिओग्राफिक क्रिएटिववर्क्सच्या सहकार्याने वीवो इमेजिन स्मार्टफोन फोटोग्राफी अवॉर्ड्सच्या चौथ्या पर्वाची घोषणा केली आहे. 'आपली जिज्ञासा तुम्हाला कुठे घेऊन जाते?' या थीमअंतर्गत देशभरातील फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीप्रेमींना स्मार्टफोनच्या माध्यमातून सर्जनशीलता आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश 23 सप्टेंबरपासून सुरू असून 1 नोव्हेंबर 2026 पर्यंत खुले आहेत. यंदाच्या पर्वात पोर्ट्रेट, नेचर अँड लँडस्केप, नाइट अँड लाइट, मोशन तसेच स्ट्रीट अँड कल्चर या पाच फोटोग्राफी कॅटेगरी आहेत. याशिवाय 'माय सिटी' या थीमसह फिल्म कॅटेगरीचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून शॉर्ट-फॉर्म व्हिडिओ आणि स्मार्टफोन स्टोरीटेलिंगला प्रोत्साहन दिले जाणार आहे. वीवो इंडिया येथील चीफ कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स ऑफिसर गीताज चन्ना यांनी सांगितले की, वीवो इमेजिनने स्मार्टफोन फोटोग्राफीच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या कथा आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ दिले आहे. फिल्म कॅटेगरीच्या समावेशामुळे व्हिडिओच्या माध्यमातून कथा सांगणाऱ्या क्रिएटर्सनाही सहभागी होता येणार आहे.




## हजारो भाविकांनी अनुभवली प्रत्यक्षात साकारलेली 'आदिशक्तीची माया'!

### शिवदर्शन मित्र मंडळ ट्रस्टच्या 'काली माता – आदिशक्ती' जिवंत देखाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवदर्शन मित्र मंडळ ट्रस्टच्या वतीने टिळक रोड येथे 'काली माता – आदिशक्ती' या संकल्पनेवर आधारित भव्य जिवंत देखावा सादर करण्यात आला. या देखाव्याला हजारो भाविकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आदिशक्तीचे सामर्थ्य, महिलांचा सन्मान आणि स्त्रीशक्तीचा जागर यांचा प्रभावी संदेश या देखाव्यातून देण्यात आला. महिलांना समाजात योग्य मान-सन्मान मिळावा, मुलींना शिक्षणाची समान संधी मिळावी, स्त्रीभ्रूणहत्या थांबवावी आणि महिलांच्या सामर्थ्याची जाणीव समाजाला व्हावी, या सामाजिक उद्देशाने हा देखावा साकारण्यात आला. काली मातेच्या रूपातून 'स्त्री ही अबला नसून आदिशक्तीचे स्वरूप आहे' हा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला. देखाव्यातील आकर्षक वेशभूषा, प्रभावी सादरीकरण आणि प्रकाशयोजनेमुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या जिवंत देखाव्याच्या माध्यमातून महिला सन्मान, मुलींचे शिक्षण, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध आणि स्त्रीशक्तीचा गौरव या सामाजिक विषयांवर जनजागृती करण्यात आली. हा देखावा टिळक रोड परिसरातील प्रमुख आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.




> "आदिशक्तीचा सन्मान म्हणजे प्रत्येक स्त्रीचा सन्मान" हा संदेश देत शिवदर्शन मित्र मंडळ ट्रस्टने धार्मिक उत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड दिली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष आबा बागुल, खजिनदार नंदकुमार बांगडे, सेक्रेटरी घनश्याम सावंत, नंदकुमार कोंडाळकर, रमेश भंडारी, आयोजक हेमंत बागुल व अमित बागुल यांच्यासह शिवदर्शन मित्र मंडळ ट्रस्टच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.
>
> **— शिवदर्शन मित्र मंडळ ट्रस्ट**

## समाजाच्या हितासाठी दिलेले योगदान अधिक महत्वाचे

### शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांचे प्रतिपादन; बन्सीरत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे विविध पुरस्कारांचे वितरण व गुणवंतांचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"बदलत्या जीवनशैलीत एकत्र कुटुंबपद्धती, माणुसकी, चांगले आचरण आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधिक अधोरेखित करण्याची गरज आहे. एकत्रित कुटुंब हीच संस्कारांची पहिली शाळा असून, चांगले वागणे, एकमेकांना आधार देणे आणि समाजाच्या जडणघडणीत योगदान देणे ही मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सुषमा व प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया हे दाम्पत्य हेच काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहेत. नव्या पिढीला आदर्श, मूल्ये, संस्कार आणि सामाजिक जाणिवेची शिकवण देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद यांनी केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित बन्सीरत्न वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. महर्षीनगर येथील शिवशंकर सभागृहातील साधना सदनमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी अहिंसा विश्वभारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनीजी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व 'आयसर'चे सल्लागार डॉ. अरविंद नातू, ज्येष्ठ अभिनेते रजा मुराद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, ज्येष्ठ शास्त्रीय गायिका डॉ. सोमा घोष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व डॉ. किमया गांधी, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, स्वर्णिमा सिद्धांत चोरडिया आदी उपस्थित होते. दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या जैन समाजातील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना मानपत्र, सन्मानचिन्ह, सुवर्णपदक व स्कार्फ देऊन गौरविण्यात आले. डॉ. लोकेश मुनीजी म्हणाले, "समाज घडविण्यासाठी केवळ वैयक्तिक यश महत्त्वाचे नसून, कुटुंब आणि समाजाप्रती असलेली जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. एकत्र कुटुंबपद्धतीतून हीच माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीची भावना पुढे जाते.




## डॉ. कोल्हे दाम्पत्याची दुधभाते नेत्रालयाला सदिच्छा भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरला सदिच्छा भेट देत नेत्रालयातील अत्याधुनिक तपासणी व उपचार सुविधांची माहिती घेतली. ग्रामीण व गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या 'फिरता नेत्र दवाखाना' (मोबाईल आय क्लिनिक) उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. या भेटीदरम्यान डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांची आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सविस्तर नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीसाठी वापरले जाणारे अद्ययावत तंत्रज्ञान, उपचारपद्धती तसेच रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची त्यांनी माहिती घेतली. नेत्रालयातील विविध विभाग, वैद्यकीय उपकरणे, स्वच्छता व्यवस्था आणि रुग्णसेवेची कार्यपद्धतीचीही त्यांनी पाहणी केली.



# दररोज बदामांचे सेवन केल्याने झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यास मदत

### नव्या संशोधनातील निष्कर्ष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

झोपेची गुणवत्ता खराब असल्याची तक्रार असलेल्या भारतीय प्रौढांसाठी आहारातील काही घटक उपयुक्त ठरू शकतात, असे नव्या संशोधनातून समोर आले आहे. कॅलिफोर्निया बदाम बोर्डच्या निधीतून करण्यात आलेल्या यादृच्छिक नियंत्रित अभ्यासानुसार, २० आठवडे दररोज बदामांचे सेवन करणाऱ्या प्रौढांनी त्यांच्या झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्याचे नोंदवले. तसेच झोपेची कार्यक्षमता वाढणे आणि झोप लागण्यासाठी लागणारा वेळ कमी होणे यासारखे बदलही आढळून आले. 'फ्रंटियर्स इन न्यूट्रिशन'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात २१ ते ५५ वर्षे वयोगटातील झोपेची गुणवत्ता खराब असल्याचे नोंदविणाऱ्या १७५ भारतीय प्रौढांचा समावेश करण्यात आला होता. सहभागींचे दोन गट करण्यात आले. एका गटाला दररोज ६० ग्रॅम बदाम, म्हणजे अंदाजे ५० बदाम, देण्यात आले; तर दुसऱ्या गटाला समान कॅलरी असलेला खाकरा, चिवडा आणि क्रॅकर्स यांसारखा नियंत्रण स्नॅक देण्यात आला.

बदामांमध्ये मॅग्नेशियम, ट्रिप्टोफॅन, व्हिटॅमिन ई, पोटॅशियम आणि असंतृप्त चरबी यांसारखी विविध पोषक तत्त्वे आढळतात. मॅग्नेशियम मज्जासंस्था आणि स्नायूंच्या सामान्य कार्यात भूमिका बजावते. ट्रिप्टोफॅनचा वापर शरीरात सेरोटोनिन आणि मेलाटोनिनच्या निर्मितीसाठी होतो.

बदामांमध्ये नैसर्गिकरित्या मेलाटोनिनचे अल्प प्रमाणही असते. याशिवाय त्यातील असंतृप्त चरबी आणि अँटिऑक्सिडंट्स त्यांच्या एकूण पोषणमूल्यात भर घालतात. त्यामुळे संतुलित आहाराचा भाग म्हणून बदामांचा समावेश करण्याकडे झोप आणि पोषणाच्या संदर्भात लक्ष दिले जात आहे. पोषण आणि आरोग्यविषयक सल्लागार शीला कृष्णस्वामी म्हणाल्या, "झोप हा एकूण आरोग्य आणि कल्याणाचा महत्त्वाचा भाग आहे. या अभ्यासातील निष्कर्ष उत्साहवर्धक आहेत. दररोज बदामांचे सेवन करणाऱ्या झोपेची गुणवत्ता खराब असलेल्या प्रौढांनी त्यांच्या झोपेच्या अनुभवात सुधारणा झाल्याचे नोंदवले. यामध्ये झोपेची गुणवत्ता, झोपेची कार्यक्षमता आणि झोप लागण्यासाठी लागणाऱ्या वेळेतील सुधारणा यांचा समावेश आहे."



त्यांनी पुढे सांगितले की, "असंतृप्त चरबी आणि झोपेला आधार देणाऱ्या संयुगांनी समृद्ध वनस्पतीजन्य पदार्थ झोपेच्या गुणवत्तेला आधार देऊ शकतात. बदामांमध्ये असंतृप्त चरबीसोबत मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन ई यांसारखी सूक्ष्म पोषक तत्त्वेही असतात."

### अभ्यासातील प्रमुख निरीक्षणे

- स्वयं-नोंदविलेल्या एकूण झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा
- झोपेच्या कार्यक्षमतेत वाढ
- अंथरुणावर घालवलेल्या वेळेपैकी अधिक वेळ झोपेत जाणे
- झोप लागण्यासाठी लागणाऱ्या वेळेत घट
- रात्री जागे राहण्याचे प्रमाण कमी होण्याचे काही संकेत
- मात्र रात्रीच्या जागरणासंदर्भातील निष्कर्ष सर्व सहभागींच्या बाबतीत सातत्याने सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आढळले नाहीत.

स्वयं-नोंद आणि वस्तुनिष्ठ मोजमाप यातील फरक महत्त्वाचा

या अभ्यासात झोपेचे मूल्यांकन दोन पद्धतींनी करण्यात आले. सहभागींच्या अनुभवावर आधारित प्रमाणित झोप प्रश्नावलींचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर पॉलिसॉम्नोग्राफी (पीएसजी) या रात्रभर करण्यात येणाऱ्या वस्तुनिष्ठ झोप तपासणीचाही वापर करण्यात आला. झोपेच्या विविध शारीरिक बाबींचे मोजमाप करण्यासाठी पीएसजी ही व्यापकपणे वापरली जाणारी पद्धत आहे.

अभ्यासातील निष्कर्ष विशेषतः स्वतः नोंदविलेल्या झोपेच्या गुणवत्तेतील सुधारणेकडे निर्देश करतात. मात्र बदामांच्या सेवनाचा वस्तुनिष्ठ झोपेच्या शारीरिक मोजमापांवर नेमका किती परिणाम होतो, हे निश्चित करण्यासाठी आणखी संशोधनाची आवश्यकता आहे.

या अभ्यासातून असे सूचित होते की, झोपेची गुणवत्ता खराब असल्याचे जाणवणाऱ्या प्रौढांच्या संतुलित आहाराचा भाग म्हणून दररोज बदामांचे सेवन केल्याने जाणवलेल्या झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यास मदत होऊ शकते. झोपेची कार्यक्षमता वाढणे आणि झोप लागण्यासाठी लागणारा वेळ कमी होणे यासारखे सकारात्मक बदलही अभ्यासात नोंदवले गेले. मात्र हा एक विशिष्ट अभ्यास असून, त्यातून बदाम हे झोपेच्या समस्यांवरील उपचार आहेत असा निष्कर्ष काढता येत नाही. बदामांचा झोपेच्या वस्तुनिष्ठ शारीरिक मापदंडांवर होणारा परिणाम आणि त्यामागील संभाव्य जैविक प्रक्रिया अधिक स्पष्ट करण्यासाठी पुढील संशोधन आवश्यक आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



## जागतिक हृदय दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे वॉकथॉनचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक हृदय दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात नागरिक, आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी आणि विविध वयोगटांतील लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हृदयविकारांपासून बचाव करण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संदेश या वॉकथॉनच्या माध्यमातून देण्यात आला. या उपक्रमादरम्यान तज्ज्ञ डॉक्टरांनी हृदयाचे आरोग्य, हृदयविकारांची लक्षणे, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर वैद्यकीय तपासणीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. धूम्रपान टाळणे, नियमित व्यायाम करणे, रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणे यांसारख्या सवयी हृदय निरोगी ठेवण्यासाठी महत्त्वाच्या असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. यावेळी मेडिकव्हर हॉस्पिटलचे डॉ. व्यास मौर्य म्हणाले, “हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नियमित व्यायाम, योग्य आहार आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी केल्यास हृदयविकारांचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते. जागतिक हृदय दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या वॉकथॉनमुळे नागरिकांमध्ये हृदयाच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.” या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हृदयाच्या आरोग्याबाबत जनजागृतीचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचला.

## राजगुरूनगरमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाईचा उत्साह

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील राजगुरुनगर शहर व परिसरातील गणेश विसर्जन मिरवणुका नेहमीच्या उत्साहात व भक्तीभावपुर्ण वातावरणात झाल्या. शहरात साडेतास मिरवणुक सुरू होती, जिवंत देखावे, तरुणाईचं बेफान नृत्य आणि डीजे-डॉल्बीचा मुक्त वापर, फटाके फोडत, ढोलताशे वाजवत गुलाल, भंडारा उधळत विसर्जन मिरवणुक पार पडली. मुख्य विसर्जन मिरवणुकीत सतरा सार्वजनिक गणेश मंडळांनी सहभाग घेतला. यावर्षीचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा झाला. विसर्जन मिरवणूकही थाटामाटात काढण्यात आल्या. दहा दिवसांच्या उत्सव काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन गणेश मंडळांनी केले होते. अनेक मंडळांनी जिवंत देखावे साकारले तर अनेक मंडळांनी विद्युत रोषणाई व आकर्षक सजावट केली होती. शुक्रवारी (दि. २५) गणपती विसर्जन मिरवणुकीची सुरुवात सांयकाळी सात वाजता पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील हुतात्मा स्मृती शिल्पापासून झाली. राजगुरूनगर शहरातील मानाच्या टिळक चौकाच्या गणपतीची पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते पूजा करून मिरणुकीला सुरुवात करण्यात आली. पुढे गावच्या वेशीत नगरपरीषदेच्या वतीने नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व इतर नगरसेवकांनी मानाच्या गणपतींचे पुजन केले.

## पुण्यातील इंजिनिअरने स्केलरच्या मदतीने बदलले करिअर



पुणे (आरंभ पर्व) : आर्थिक अडचणी असूनही नोकरी सांभाळत कौशल्यविकास करून सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगमध्ये करिअर करण्याचे स्वप्न पुण्यातील अजय तानाजी पाटील यांनी पूर्ण केले. ‘स्केलर’च्या माध्यमातून कौशल्ये विकसित केल्यानंतर त्यांना ‘सेल्सफोर्स’मध्ये टेक्निकल सपोर्ट इंजिनिअर म्हणून नोकरी मिळाली. या नोकरीतील त्यांचे वेतन सुरुवातीच्या पगारापेक्षा तब्बल ६७० टक्क्यांनी अधिक आहे. अजय यांच्या वडिलांचे त्यांचे वय अवघे पाच वर्षे असताना निधन झाले. त्यांची आई मंगलबाई यांनी एकट्याने त्यांचा सांभाळ केला. शिक्षण सुरू ठेवण्यासाठी त्यांनी १५ वर्षांहून अधिक काळ शिक्षिकेची नोकरी केली, तसेच शिवणकामही केले. आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन अजय यांनी पुण्यात मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. शिक्षण सुरू असतानाच वयाच्या १८व्या वर्षी त्यांनी ‘टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स’मध्ये डिझाइन इंजिनिअर म्हणून कामाला सुरुवात केली. मात्र, त्यांना सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगमध्ये करिअर करायचे होते.कोडिंगची पार्श्वभूमी नसल्याने त्यांच्यासमोर मोठे आव्हान होते. नोकरी सोडून शिक्षण घेणेही शक्य नव्हते.

# शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या

## कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांची मागणी; मित्रपरिवाराकडून ८६ व्या वर्षात पदार्पणानिमित्त सत्कार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाच्या अनियमिततेमुळे शेती संकटात सापडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे," अशी मागणी ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी केली. डॉ. मुळीक यांनी २७ सप्टेंबर रोजी वयाची ८५ वर्षे पूर्ण करून ८६व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त भूमाता परिवार आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळ, हवामान बदल, शेतीचे प्रश्न आणि शेतकरी धोरणांबाबत भूमिका मांडली.

भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. सुरेश पवार, डॉ. एम. एस. जाधव, प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, ॲड. केदार सोमण, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, माजी महापौर कमल व्यवहारे, महिपतराव फडतरे, ॲड. कमल सावंत, डॉ. श्यामराव भगत, सुरेश कोते, यशवंत खैरे, हेमंत सूर्यवंशी, सुरेश खोपडे यांच्यासह कृषी, राजकीय व प्रशासनातील अनेक मान्यवरांनी डॉ. मुळीक यांना शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले. अमेरिकेच्या कृषी खात्यात प्रधान अर्थशास्त्रज्ञ पदावर काम करणाऱ्या त्यांच्या कन्या डॉ. क्रांती मुळीक या वडिलांच्या वाढदिवसानिमित्त आवर्जून उपस्थित होत्या. डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले, “दुष्काळी भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना दररोज ३०० रुपये मजुरी देऊन त्यांच्या शेतातच जलसंधारण आणि शेतीची कामे उपलब्ध करून द्यावीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबाला उत्पन्न मिळेल आणि त्याच्या शेतातील पाण्याच्या उपलब्धतेतही वाढ होईल. त्यातून शेतकऱ्याचा सन्मानही कायम राहील. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, देशाचा प्राण आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी कायद्याचे संरक्षण आणि उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाल्याशिवाय शेती व शेतकरी समृद्ध होणार नाही. शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल."

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जे माफ करून बँका, पतसंस्था आणि खासगी सावकारांची सक्तीची वसुली थांबवावी, अशी मागणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या उच्च, तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाचा तसेच वसतिगृहाचा खर्च सरकारने करावा. पशुधनासाठी पाणी व चाऱ्याच्या छावण्या तातडीने सुरू कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. युवा पिढीने कृत्रिम जीवन जगण्यापेक्षा निसर्गाशी नाळ जोडून नैसर्गिक जीवन जगावे. टेक्नॉलॉजी आणि शिक्षणाचा वापर शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी, तण-खत व्यवस्थापनासाठी आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी करा, असा संदेश त्यांनी दिला.

पूर्वी मराठवाडा हा धान्याचे कोठार मानला जात होता. मात्र, संकरित बियाणे, नगदी पिकांचा वाढता आग्रह आणि गायरानांचे कमी होणे यामुळे शेती व पशुधनासमोर संकट निर्माण झाले आहे. रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शहरातील जैविक कचऱ्यापासून सेंद्रिय खते तयार करून ती शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाच्या नुकसानीवर आधारित कायदेशीर भरपाईची व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्याची गरज आहे. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि शुद्ध अन्न हे मूलभूत हक्क आहेत आणि ते शेतकरीच उपलब्ध करून देतो, असे त्यांनी नमूद केले.

प्रवीण तरडे व राज देशमुख यांनी डॉ. बुधाजीराव मुळीक गेल्या ६० वर्षांपासून शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी वेगवेगळे प्रयोग करीत असून, त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. डॉ. मुळीक यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतीमधील प्रयोगांसाठी वाहून घेतले आहे. वयाच्या पंच्याऐंशीमध्येही त्यांचे प्रयोग आणि शेतकऱ्यांसाठीचा लढा सुरु आहे. येत्या काळातही त्यांच्याकडून शेतकऱ्यांना व शेती क्षेत्राला मार्गदर्शन होत राहावे, असे मत व्यक्त केले.

## नंदकुमार चौधरी यांची सरचिटणीसपदी निवड

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

सोरतापवाडी येथील काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते नंदकुमार खंडेराव चौधरी यांची पुणे जिल्हा काँग्रेसच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. पुणे जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कमलाकर सातव यांनी चौधरी यांची निवड केली. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या नंदकुमार चौधरी यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने सोरतापवाडी परिसरासह हवेली तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ देण्यासाठी तसेच काँग्रेसची ध्येयधोरणे आणि विचारधारा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित जिल्हा सरचिटणीस नंदकुमार चौधरी यांनी सांगितले. राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष देविदास भन्साळी, पुणे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष कमलाकर सातव आणि आमदार विश्वजित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी काम करणार असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांच्या समस्या पक्षाच्या माध्यमातून मांडण्याबरोबरच काँग्रेसची भूमिका घराघरांत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील; उपाध्यक्षपदी आमदार बाबाजी काळे, तर मानद सचिवपदी नानासाहेब टाकळकर







**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची २०२६ ते २०३१ या पंचवार्षिकसाठी नवनियुक्त कार्यकारिणीची संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी जाहीर केली. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. संस्थेच्या उपाध्यक्षपदी आमदार बाबाजी काळे, तर मानद सचिवपदी नानासाहेब टाकळकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

तसेच संचालक म्हणून बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, सुशिल शिंगवी, अश्विनी मोरमारे, प्रा. डॉ. प्रकाश चौधरी पाटील, मुरलीधर खांगटे, प्रमोद गानू, नितीन गोरे, सुभाष टाकळकर, बाळासाहेब लिंभोरे पाटील, राजेंद्र टाकळकर, आशुतोष थिगळे, वैभव घुमटकर, अमर शिंदे, विशाल थिगळे, नामदेव कलवडे व सत्यवान नवले यांनी कार्यभार स्वीकारला. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी नवनियुक्त पदाधिकारी व संचालकांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध करण्यासोबत संस्थेच्या भौतिक विकासाला गती देण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी पदाधिकारी व संचालकांनी व्यक्त केला.

## गावठी पिस्तूलसह तरुण जेरबंद; ५० हजाराचा मुद्देमाल जप्त




**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) खेड तालुक्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कारवाई केली. चांडोली गावच्या हद्दीत एका हॉटेलच्या पाठीमागील परिसरात एका १९ वर्षीय तरुणाकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूसे जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणी पृथ्वी उर्फ काळू नितीन सावंत (वय १९, रा. चांडोली, ता. खेड) याला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बुधवारी (दि. २३) गणेशोत्सवादरम्यान सायंकाळी साडेसहा वाजता खेड पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी चांडोली गावच्या हद्दीत एका हॉटेलच्या पाठीमागे एक इसम संशयास्पदरित्या फिरत असल्याचे पथकाला आढळले. पोलीसांनी चौकशी करून त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्तूल आढळले. चौकशीत त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून ५० हजार रुपये किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूसे असा एकूण ५० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे महादेव शेलार, शरद बांबळे, पोलीस हवालदार संदीप फड, स्वप्नील गाढवे, हनुमंत ढोबळे तसेच खेड पोलीस ठाण्याचे संतोष घोलप, सागर शिंगाडे यांनी केली.

## ट्रूकॉलरने लॉंच केले स्कॅम चेकर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ट्रूकॉलरच्या वतीने आज वेब आणि ॲपवर ट्रूकॉलर स्कॅम चेकर सुरू करण्याविषयीची घोषणा करण्यात आली. लोक एखाद्या घोटाळ्याचा सामना करत आहेत की नाही याचे त्वरित मूल्यांकन करण्यात मदत करण्यासाठी आणि नवीन स्वरुपाच्या फसवणुकीबद्दलच्या ट्रेंडबद्दल माहिती ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेले एक नवीन डेस्टिनेशन आहे. कॉलर आयडेंटिफिकेशन म्हणजे कॉल करणाऱ्याची ओळख आणि स्पॅम ब्लॉकिंग/अवरोधन यांच्या पलीकडे ट्रूकॉलरमार्फत घोटाळ्यापासून संरक्षण वाढवणे हा यामागचा हेतू आहे. हा उपाय एकाच अनुभवामध्ये अनेक घोटाळ्यांचा शोध घेण्याची क्षमता एकत्र आणतो. ज्यामुळे वापरकर्त्यांना संशयास्पद वेब दुवे तपासणे, फोन नंबर शोधणे, संबंधित घोटाळ्याचे अहवाल शोधणे आणि कारवाई करण्यापूर्वी संभाव्य फसवणुकीचे प्रयत्न अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे शक्य होते. ट्रूकॉलर स्कॅम चेकरच्या मदतीने युजर्सना सायबर फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी अनेक उपयुक्त सुविधा मिळतात. याद्वारे युजर्स एखाद्या लिंकची त्वरित तपासणी करून ती फिशिंग किंवा द्वेषयुक्त (malicious) उद्देशाने पाठवण्यात आली आहे का, हे शोधू शकतात.

# पर्यटनाच्या विकासासाठी चित्रपटांचे माध्यम उपयुक्त

## ओम राऊत यांचे मत; परभन्ना फाऊंडेशनतर्फे पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचा समारोप




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पर्यटन आणि लघुपट-चित्रपटनिर्मिती ही परस्परपूरक क्षेत्रे ठरू शकतात आणि त्यामध्ये युवा दिग्दर्शकांसाठी अनेक नव्या संधी आहेत. त्या संधींचा योग्यप्रकारे लाभ उठवायला हवा, असे मत प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते ओम राऊत यांनी व्यक्त केले. पर्यटन आणि चित्रपट, या दोन्ही ठिकाणी आपण एक गोष्ट सोबत घेऊन येतो, जी आपल्याला जागे करते, संवेदनशील बनवते, जाणिवा समृद्ध करते, असेही ते म्हणाले. जागतिक पर्यटन दिनानिमित्त परभन्ना फाऊंडेशन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, दादासाहेब फाळके चित्रनगरी आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बाणेर येथील यशदामध्ये आयोजित पाचव्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाच्या पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी ओम राऊत यांना 'परभन्ना विशेष योगदान पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे आणि माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विहार ट्रॅव्हल्सचे दीपक पुजारी यांना 'परभन्ना जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. तो ऋषिकेश पुजारी यांनी स्वीकारला. उत्कृष्ट कृषी पर्यटन पुरस्कार मधुबन ॲग्रो टुरिझम चंद्रपूर यांना देण्यात आला.

समारोपावेळी महोत्सवाचे प्रमुख संयोजक गणेश चप्पलवार, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रनगरीचे जनसंपर्क अधिकारी पंकज चव्हाण, परीक्षक वैशाली केंदळे आणि डॉ. अनमोल कोठडिया, तर उद्‌घाटन सोहळ्याला ज्येष्ठ संपादक संजय आवटे, महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य विभाग आणि मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष सचिन इटकर, पुणे पर्यटन विभागाचे उपसंचालक भरत लांघी, महोत्सवाचे सल्लागार प्रा. राजीव घोडे, फाउंडेशनचे सचिव मनीषा उगले आदी उपस्थित होते.

'चित्रपटांच्या माध्यमातून पर्यटनाचा प्रसार' या संकल्पनेवर आधारित या दोन दिवसीय महोत्सवात लघुपट प्रदर्शनासह मुलाखती, परिसंवाद, समूहचर्चा आणि मास्टरक्लास अशी संवादात्मक सत्रे झाली. दोन दिवसांत २६ लघुपट, माहितीपटांचे स्क्रिनींग झाले. निवडक ५० छायाचित्रांचे प्रदर्शन लागले होते. यंदाच्या महोत्सवात लघुपट, माहितीपट, व्हीलॉग आणि विद्यार्थी चित्रपट, अशा विभागांत पुरस्कार देण्यात आले. सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार 'द रिकार्ड डान्स'ला, तर सर्वोत्कृष्ट लघुपट पुरस्कार 'केकी' या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार माहितीपटासाठी नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांना मिळाला. शशांक शेंडे यांनी सर्जनशील निर्मितीमध्ये आशय सर्वात महत्त्वाचा असून, तो लघुपटांतून जपण्याचे आवाहन केले. शेखर गायकवाड म्हणाले, पर्यटनाच्या संकल्पना बदलत आहेत. नवी पिढी आता केवळ स्थळदर्शन न करता, तेथील विशिष्ट अनुभवाला प्राधान्य देत आहे. यशदामधील सर्व प्रशिक्षणांचा प्रारंभ कुठल्यातरी औचित्यपूर्ण लघुपट, माहितीपटानेच होतो. आपल्याकडे प्रत्येक गावाचे ब्रँडिंग होणे आवश्यक आहे, इतकी विविधता आणि वेगळेपण आहे. ते नेमकेपणाने ओळखून मांडण्याची आवश्यकता आहे. गणेश चप्पलवार यांनी असे वेगळेपण शोधण्याची कल्पकता या महोत्सवाच्या आयोजनातून दाखवली आहे.

मेघराज राजेभोसले यांनी महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद अभिनंदनीय आहे. हा महोत्सव वेगळेपण जपणारा आहे. त्यामुळे यापुढेही महोत्सवाला आमचे सहकार्य मिळत राहील, असे सांगितले. पंकज चव्हाण यांनी महोत्सवाचे आय़ोजन आव्हानात्मक असून चित्रनगरीचे सहकार्यही महोत्सवासाठी असेल. नव्या फिल्म मेकर्सनी चित्रनगरीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

परीक्षकांतर्फे मनोगत मांडताना कोठडिया यांनी नव्या दिग्दर्शकांनी निर्मितीच्या विविध शक्यता आजमावण्याची गरज अधोरेखित केली. वैशाली केंजळे यांनीही मनोगत मांडले. ज्येष्ठ पत्रकार जयश्री बोकील यांनी मानपत्र लेखन आणि वाचन केले. अमित त्रिभुवन यांनी आभार मानले. आरजे तेजस्वी फुलसुंदर, प्रा. डॉ. सुनील धनगर यांनी सूत्रसंचालन केले.

### ‘द रिकार्ड डान्स’, एकोज ऑन द वॉल्स’ व ‘केकी’ची बाजी

सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा प्रथम पुरस्कार ‘द रिकार्ड डान्स’ व ‘एकोज ऑन द वॉल्स’ या माहितीपटाला, तर द्वितीय पुरस्कार ‘द लास्ट पॅरेडाईज’ आणि ‘होड्यांचे गाव’ या माहितीपटाना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार ‘केकी’ या लघुपटाला मिळाला. उत्कृष्ट व्हीलॉगचा पुरस्कार ‘द शॅटर्ड मिरर्स ॲन एपिफनी’ आणि ‘वास्टर बीर’ यांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थी विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार ‘अलक’, तर सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार ‘द व्हॉईस ऑफ ओल्ड’ याला मिळाला. उत्कृष्ट दिग्दर्शक (माहितीपट) म्हणून नीलेश कुंजीर, तर लघुपटासाठी तुषार उडेग यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र पर्यटन विशेष उल्लेखनीय पुरस्कार ‘कोकणातील शाश्वत पर्यटन’ आणि ‘दिंडी – वे ऑफ लाईफ’ यांना मिळाला. तसेच परीक्षकांचा विशेष पुरस्कार ‘लीगसी इन ट्यून्स’, ‘आगम’ आणि ‘महाबळेश्वर फॉरेस्ट’ या कलाकृतींना देण्यात आला.



दै. आरंभ पर्वला
जाहिरात देऊन तर पहा..!
आपल्या व्यवसायाची भरारी,
आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!
आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा दैनिक आरंभ पर्व.
कमी खर्चात अधिक वाचकांपर्यंत पोहोच
शहर, उपनगर व ग्रामीण भागात व्यापक प्रसार
आकर्षक मांडणी आणि प्रभावी सादरीकरण
व्यावसायिक, सामाजिक व शासकीय जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
मुद्रित आणि डिजिटल प्रसिद्धीची सुविधा
दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
आपल्या यशाची सुरुवात
योग्य प्रसिद्धीपासून...!
आजच जाहिरात द्या आणि
आपल्या व्यवसायाला
द्या नवी ओळख..!
दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"
जाहिरात विभागाशी संपर्क साधा
लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक
8605284272
आजची जाहिरात,
उद्याची यशोगाथा..!




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
पुणे प्रहार
NEWS CHANNEL
दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी
संपूर्ण महाराष्ट्रात
पत्रकार नेमणे आहे!
आपणही बना आमच्या टीमचा भाग !
आम्हाला हवे आहेत :
पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.
PRESS
कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.
आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.
कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)
पुणे प्रहार
महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.
आमच्याशी जोडल्याने मिळेल :
विश्वसनीय वृत्तांकन
व्यापक वाचकवर्ग
नि:पक्ष व सकारात्मक पत्रकारिता
प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर
बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!
आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!
संपर्क : 7276314142
आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!